नागरी जमीन कमाल धारणा क्षेत्रिय कार्यालयातील अस्थायी पदांना सन २०१८-१९ करिता मुदतवाढ देण्याबाबत...
दि.०१.०३.२०१८ ते दि.३०.०९.२०१८

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : मुदवा-४३१८/५९२/प्र.क्र.४२/२०१७/नवि-२७

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
चौथा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
तारीख: २० एप्रिल, २०१८.

वाचा :-

१. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.असंक-१००४/प्र.क्र.१२ (भाग-२)/२००४/वित्तीय सुधारणा-१, दि.०४.१०.२००४.
२. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.टिपीव्ही-१०२००३/८६६/प्र.क्र.१२४/०३/नवि-२७, दि.०१ मार्च, २००६.
३. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.नाजक-२०१२/प्र.क्र.१४०/नाजकधा-१, दि.२१.०७.२०१६.
४. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.नाजक-२०१२/प्र.क्र.१४०/नाजकधा-१, दि.३१.०८.२०१६.
५. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.मुदवा-४३१८/५९२/प्र.क्र.४२/नवि-२७, दि.२३.०१.२०१८.
६. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०५.०३.२०१८.

प्रस्तावना :-

नगर विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ हा कायदा राज्यात दि.१७.०२.१९७६ पासून नऊ नागरी समूहात लागू होता. राज्य विधिमंडळाने नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९, दि.२९.११.२००७ पासून स्वीकृत केला असल्याने त्या आस्थापनेवरील पदांचा आढावा घेऊन, नऊ नागरी समूहातील ९७ अस्थायी पदांना संदर्भाधिन, दि.२३.०१.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.०१.०१.२०१८ ते दि.२८.०२.२०१८ या कालावधीकरिता मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे.

०२. नगर विकास विभागाच्या संदर्भाधीन-२ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील नऊ नागरी समूह (नाजकधा) कार्यालयातील विविध संवर्गातील २२९ पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला असून या आकृतीबंधास उच्चस्तर सचिव समितीने मान्यता दिलेली आहे.

०३. नगर विकास विभागाच्या संदर्भाधिन, दि.२१.०७.२०१६ व दि.३१.०८.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुक्रमे ठाणे, नाशिक, नागपूर, उल्हासनगर, सोलापूर, कोल्हापूर, सांगली व मुंबई तसेच पुणे येथील नागरी समूहांकडील नागरी जमीन कमाल धारणा हा विषय कार्यालयीन कर्मचाऱ्यांसह संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला आहेत. तसेच यापुढे नाजकधा अधिनियम सन १९९९ ची अंमजबजावणी करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांना नागरी समूहाचे “सक्षम प्राधिकारी” म्हणून घोषित करण्यात आले आहे.

०४. सद्य:स्थितीत, राज्यातील नऊ (बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, मुख्यालय ठाणे, पुणे, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, नाशिक व नागपूर) नागरी समूह कार्यालयांकडील कामकाजाचा आढावा घेता त्या कार्यालयातील विविध संवर्गातील ९७ अस्थायी पदांना दि.०१.०३.२०१८ ते दि.३०.०९.२०१८ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

<u>शासन निर्णय :-</u>

राज्यातील नऊ (बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, मुख्यालय ठाणे, पुणे, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, नाशिक व नागपूर) नागरी समूह कार्यालयांकडील दैनंदिन कामकाजाचा आढावा घेता या शासन निर्णयासोबतच्या “परिशिष्ट-अ” मध्ये नमूद करण्यात आलेल्या विविध संवर्गातील ९७ अस्थायी पदांना दि.०१.०३.२०१८ ते दि.३०.०९.२०१८ या कालावधीकरिता मुदतवाढ मंजूर करण्यात येत आहे.

०२. या बाबीवर होणारा खर्च “२०५३-जिल्हा प्रशासन (०९४) इतर आस्थापना नागरी जमीन (कमाल धारणा विनियम) अधिनियम, १९७६ यासाठी कर्मचारी वर्ग (२०५३ १०७१)” या लेखाशिर्षाखाली नोंदविण्यात येऊन सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

०३. सदरचे आदेश वित्त विभाग, शासन निर्णय क्र.असंक-१००४/प्र.क्र.१२ (भाग दोन)/२००४/वित्तीय सुधारणा-१, दि.०४.१०.२००४ व वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.,

दि.०५.०३.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१८०४२०११३७२३९०२५** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vishnu Shripati Patil

Digitally signed by Vishnu Shripati Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=21ebe4508a75a767041512feeaa6b8f2d5bc8caf857fe02cd29ce4bbb772da09, serialNumber=f8a0fc598f692587efafe9bd62df9e449fdf81c803c27adf1782c97c76ebcba5, cn=Vishnu Shripati Patil
Date: 2018.04.20 17:10:49 +05'30'

विष्णू पाटील
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
२. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा), मुंबई.
४. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परिक्षा), नागपूर.
५. प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. जिल्हाधिकारी, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, नाशिक व नागपूर.
८. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे.
९. उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, नागपूर.
१२.सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी, -------------------------------

१३.संबंधित नागरी समूह कार्यालये, बृहन्मुंबई / ठाणे / उल्हासनगर / पुणे / कोल्हापूर / सांगली / सोलापूर, नाशिक व नागपूर.

१४.कक्ष अधिकारी (व्यय-३ / अर्थसंकल्प-१९ / वित्तीय सुधारणा-१) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

१५.कक्ष अधिकारी (नाजकधा-१, नाजकधा-२, नाजकधा-३ व नवि-४), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६.मा. प्रधान सचिव (नवि-१) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१७.निवडनस्ती / नवि-२७.

*****

परिशिष्ट - अ

नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.मुदवा-४३१८/५९२/प्र.क्र.४२/नवि-२७, दि.२० एप्रिल, २०१८ चे सहपत्र.

नागरी जमीन कमाल धारणा, नागरी समूह कार्यालयांमधील अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत.

(दि.०१.०३.२०१८ ते दि.३०.०९.२०१८)

अ. क्र.	अस्थायी पदाचे नांव	नागरी जमीन कमाल धारणा, नागरी समूहाचे नांव									एकूण
		बृहन्मुंबई	ठाणे	उल्हासनगर	पुणे	कोल्हापूर	सांगली	सोलापूर	नाशिक	नागपूर	
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
१	उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी	०	०	०	१	०	०	०	०	०	१
२	तहसिलदार	०	०	०	१	०	०	०	१	०	२
३	सहाय्यक नगर रचनाकार	३	१	१	१	१	०	०	१	१	९
४	नायब तहसिलदार	२	०	०	०	०	०	०	०	०	२
५	रचना सहाय्यक	०	२	०	१	०	०	०	०	०	३
६	लघुलेखक (निम्नश्रेणी)	०	०	०	१	०	०	०	०	०	१
७	उप लेखापाल	१	१	१	१	०	०	०	१	०	५
८	मंडळ अधिकारी	०	१	१	०	०	०	०	०	०	२
९	अव्वल कारकून	४	२	१	४	१	२	१	१	१	१७
१०	परिरक्षण भूमापक	२	१	१	१	०	१	०	०	०	६
११	लघुटंकलेखक	१	०	०	१	०	०	१	०	१	४
१२	अनुरेखक	३	०	०	१	०	०	०	०	०	४
१३	लिपिक / लिपिक-टंकलेखक	४	१	१	१	२	१	१	१	३	१५
१४	टंकलेखक	१	०	०	०	०	०	०	०	०	१
१५	वाहन चालक	०	०	०	१	०	०	०	०	०	१
१६	शिपाई	७	४	२	३	१	१	१	१	३	२३
१७	खलाशी	१	०	०	०	०	०	०	०	०	१
	एकूण :-	२९	१३	०८	१८	०५	०५	०४	०६	०९	९७

Vishnu Shripati Patil

Digitally signed by Vishnu Shripati Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=21ebe4508a75a767041512feeaa6b8f2d5bc8caf857fe02cd29ce4bbb772da09, serialNumber=f8a0fc598f692587efafe9bd62df9e449fdf81c803c27adf1782c97c76ebcba5, cn=Vishnu Shripati Patil
Date: 2018.04.20 17:11:46 +05'30'

(विष्णू पाटील)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

*****